आपत्ती व्यवस्थापनात लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाची भूमिका : एक चिकित्सक अभ्यास (कालावधी - २०११ ते २०२३)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

अंतर्गत लोकप्रशासन विषयासाठीचा पीएच. डी. पदवी

संशोधन आराखड्याचा आकृतीबंध

~:संशोधक: ~

स्फुर्ती संजय समुद्रे

~:मार्गदर्शक: ~

प्रा.डॉ. गौरव गोविंदराव जेवळीकर

लोकप्रशासन विभाग

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर, जि. लातूर

~: **संशोधनकेंद्र** :~

देगलूर कॉलेज, देगलूर

~:शैक्षणिक वर्ष: ~

(सप्टेंबर—२०२३

1) प्रस्तावनाः

आपत्ती या अचानक उद्‌भवत असतात. आपत्तींमुळे होणा-या जीवित व वित्त हानींमुळे राष्ट्रासमोर मोठ्या प्रमाणात संकटे उभे राहत आहेत. आपत्ती ही सार्वत्रीक स्वरूपाची असते. सातत्याने नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीचा सामना जगातील सर्वच राष्ट्रांना करावा लागत आहे. याच आपत्तीच्या व्यवस्थापनासाठी 1990 ते 2000 हे आंतरराष्ट्रीय स्तरावर आपत्तीचे दषक म्हणून जाहीर झाले. आंतरराष्ट्रीय स्तरावरती आपत्तीचा सामना करण्यासंदर्भात अनेक चर्चासत्र, बैठका, परिशदा होत आहेत. याच आपत्तीचा सामना करण्याच्या दृष्ट्रीने जपान येथे सन 1994 मध्ये योकोहामा या परिशदेने आपत्ती प्रतिबंध व मदत (उपाय योजना) या संदर्भात विचार करायला भाग पाडले. भारतात देखील 1993 चा किल्लारीचा भूकंपाने प्रशासन यंत्रणेत आपत्ती व्यवस्थापन गरजेचे असते हे लक्षात आले. यानंतर देखील भारतात अनेक मोठ मोठ्या आपत्ती घडून आल्या. यातूनच भारतीय प्रशासनात आपत्तीचा सामना करण्यासाठी एक सक्षम यंत्रणा असणे आवश्यक वाटले. याच विचारातून 23 डिसेंबर 2005 रोजी आपत्ती व्यवस्थापन कायद्‌याची निर्मिती करण्यात आली.

आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 अन्वये त्रिस्तरीय यंत्रणा निर्माण केली. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (संस्था) अशा राष्ट्र ते स्थानिक पातळीवर स्थापित करण्यात आले. यामुळे आपत्तींना प्रतिबंधित करण्यात मदत होऊ लागली. आपत्ती ग्रस्तांना लागणारे साहित्य, आपत्ती व्यवस्थापन कृती आराखाड्याची निर्मिती या व अशा अनेक गोष्टी आपत्ती व्यवस्थापनासंदर्भात घडू लागल्या.

आपत्ती घडल्यानंतर जिल्हा पातळीवर सक्षम यंत्रणा असणे आवष्यक आहे. या दृश्टीने आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चौथ्या प्रकरणातील विभाग 25 ते 34 मध्ये जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाची तरतूद केल्याचा उल्लेख आहे. याच पार्श्वभूमीवर लातूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कार्यालयीन यंत्रणेचा अभ्यास करणे आवशयक वाटते. आपत्ती व्यवस्थापनाचा जिल्हा प्रमुख या नात्याने जिल्हाधिकारी यांची भूमिका अभ्यासणे आवशयक ठरते. जिल्हा स्तरावरील आपत्ती संदर्भामध्ये विविध धोरणे, उपक्रमे, कार्यक्रम यात लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाचे योगदान महत्वपूर्ण ठरते.

जिल्ह्यात होणा-या भूकंप, दुश्काळ, वीज प्रलय, पाणी टंचाई इ. समस्यांमुळे प्रशासनाच्या समोर अनेक प्रष्न निर्माण झाले आहेत. तसेच कोविड - 19 यासारख्या जागतिक स्वरूपाच्या

आपत्तीचा सामनादेखील लातूर जिल्ह्याने केला आहे. त्यातून आपत्तीग्रस्तांचे पुनर्वसन व मदतकार्य यात लातूर जिल्हाधिकारी कार्यालय कसे सक्षम ठरेल याचा अभ्यास होणे गरजेचे वाटते.

प्रस्तुत विशयात संषोधन होणे गरजेचे ठरते. या कारणाने 'आपत्ती व्यवस्थापनात लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाची भूमिका - कालावधी 2011 ते 2023' अभ्यासणे आवष्यक वाटते.

2) संषोधन विशयाची निवड

समस्येचे सुत्रण हे संपूर्ण संषोधनासाठी महत्वाचे ठरते. यात प्रशासनाची एक विद्यार्थी म्हणून प्रशासन व आपत्ती याचा अभ्यास होणे आवश्यक वाटले. आपत्तीचे वर्गीकरण नैसर्गिक व मानवनिर्मित या घटकात होते. या दोन्हीही घटकांची व्यापकता अधिक आहे. जिल्ह्यानुसार आपत्तीचे स्वरूप, परिणामकारकता कमी.अधिक प्रमाणात असते. यात लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाची यंत्रणा कषी कार्य व अंमलबजावणी करते, कोठे काय त्रुटी, मर्यादा, उपाययोजना याचा सविस्तर अभ्यास करण्याच्या अनुशंगाने कालावधी म्हणून दहा वर्शे समोर ठेवले आहे.

अभ्यास विषयाची गरज:

(1) आपत्ती व्यवस्थापनासंदर्भात सूक्ष्म ज्ञान प्राप्त झाल्यास आपत्तीवर मात करण्यास मदत होते.

(2) सामाजिक जाणिवेतून विषयाची निवड.

3) आपत्ती व्यवस्थापन अभ्यासक्रमात शिक्षण, प्रशिक्षण देऊन आपत्तीवर मात करणारी सक्षम पिढी घडविणे या दृष्टीकोनातून अभ्यास करणे.

(4) जिल्हाधिकारी प्रशासन व्यवस्था, शासन व जनता यांच्यातील दरी कमी करून एक सामाजिक जाणिवेतून चळवळ निर्माण करणे.

3) संषोधनाची उदिष्टे

(1) आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चा अभ्यास करणे.

(2) लातूर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत आपत्तीचे व्यवस्थापन कार्यपध्दतीए प्रशासकीय यंत्रणा व आपत्ती निवारण कक्ष याचा अभ्यास करणे.

(3) लातूर जिल्ह्यातील आपत्तीचा अभ्यास करणे. (नैसर्गिक आणि मानवनिर्मित)

(4) कोविड 19 आपत्ती मधील लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

(5) लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातील आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमाचा अभ्यास करणे.

(6) लातूर जिल्हाधिकारी कार्यालय आपत्ती व्यवस्थापन कक्षासमोरील आव्हानांचा अभ्यास करणे.

(7) लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आपत्ती व्यवस्थापन कार्यात स्थनिक प्रसारमाध्यांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

4) संषोधनाची गृहितके

(1) आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 अन्वये लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात स्वतंत्र आपत्ती व्यवस्थापन समितीची (प्राधिकरण) स्थापना करण्यात आली आहे.

(2) लातूर जिल्हाधिकारी कार्यालयास आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक निधी मंजूर करून दिला जातो.

(3) आपत्ती व्यवस्थापनामध्ये कार्य करताना स्थानिक प्रसारमाध्यमांचा उपयोग होतो.

(4) लातूर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत आपत्ती नियोजन कृती आराखडा निर्माण केला जातो.

(5) लातूर जिल्ह्याातील आपत्ती प्रवण भागाचा विचार करून त्याचे आपत्तीपूर्व नियोजन केले जाते.

(6) कोविड 19 मध्ये लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातील आपत्ती निवारण कक्षाने सक्षमपणे भूमिका पार पाडली.

5) तथ्य संकलन

संषोधक तथ्य संकलनाला आपल्या अध्ययनाचा आत्मा मानतो. त्यामुळे तथ्य संकलनाच्या आधारे संषोधक निश्कर्शापर्यंत पोहोंचतो ही बाब लक्षात घेतली पाहिजे. 'आपत्ती व्यवस्थापनात लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाची भूमिका - कालावधी 2011 ते 2023' या विशयासंबंधी तथ्य संकलन प्राथमिक स्त्रोत व द्‌वितीय स्त्रोत या दोन्ही प्रकारच्या स्त्रोतांचा आधार घेतला जाणार आहे.

प्राथमिक स्त्रोत: संषोधक स्वतः घटनास्थळावर उपस्थित राहून अवलोकन(Observation), अनुसूची(Schedule), मुलाखत (Interview) प्रश्नावली ; (Questionnaire) इ. माध्यमातून माहिती व आकडेवारी गोळा केली जाणार आहे.

द्वितीयक स्त्रोत: द्वितीय तथ्य सामग्रीत प्रकाषित किंवा अप्रकाषित दस्तऐवज तसेच जीवनी, रोजनिशी, पत्र, आठवणी, सार्वजनिक प्रलेख, शासकीय व अशासकीय संस्थांचे अहवाल. त्याचबरोबर दैनिके, साप्ताहिके, मासिके, विषेशांक यांचा वापर तथ्य संकलनासाठी करण्यात येणार आहे. त्याचबरोबर इलेक्ट्रॉनिक

प्रसारमाध्यमांद्वारे (इंटरनेटवरील विविध संसाधने) प्रसारित होणाÚया माहितीच्या आधारे तथ्य संकलित केले जाणार आहेण्.

6) सहभागी निरीक्षण

जिल्ह्यातील आपत्तीग्रस्त भागांना भेट देणे व जिल्हाधिकारी यांची मुलाखत घेऊन प्रषासनांची भूमिकाए त्यांच्या समोरील आव्हानेए उपाययोजना या संबंधी अभ्यास करणे तसेच जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत होणाÚया विविध प्रशिक्षणात एक प्रशिक्षणार्थी म्हणून अभ्यास करणे. तसेच आपत्ती व्यवस्थापन संदर्भातील वेगवेगळ्या पैलूंवर संपादकीय पुस्तकांची निर्मिती करून त्यातील समस्येवर मात करणे. 2011 ते 2023 मध्ये जिल्हाधिका-यांसमोर झालेल्या आपत्तींचा सामना करताना झालेल्या बदलाचा आढावा घेणे. जिल्हाधिकारी कार्यालय अंतर्गत येणाÚया क्षेत्रातील विविध आपत्तींचा अभ्यास करणे.

7) नमुना निवड

शितावरून भाताची परीक्षा या उक्तीप्रमाणे नमुना निवडीच्या आधारे लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातील आपती व्यवस्थापन कक्षाषी निगडीत प्रषासकीय अधिका-यांची निवड करून आपत्ती निवारणात त्यांच्या भूमिकेंचा अभ्यास केला जाणार आहे. तसेच 10 तालूक्यातील तहसिलदार यांच्या देखील मुलाखती घेतल्या जाणार आहेतण् लातूर जिल्हातील आपत्ती व्यवस्थापनात जनतेचा सहभाग देखील नमूना म्हणून केला जाईल यात लातूर येथील 2011 ते 2023 या कालावधीतील पाच जिल्हाधिकारी यांची निवड संषोधनासाठी करण्यात आली आहे.

8) संषोधनाच्या मर्यादा

जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकाÚयांषी प्रत्यक्ष भेटीस विलंब लागू षकतो. कार्यालयीन काही माहितीबाबत गुप्तता राखली जावू षकते.

9) संषोधन आराखडा

विषयाच्या अनुशंगाने संषोधन आराखड्यांच्या विविध प्रकारांचा वापर केला जाईल.

10) प्रकरण मांडणी

‘आपत्ती व्यवस्थापनात लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाची भूमिका - कालावधी 2011 ते 2023’ या विशयाचा पुढील प्रकरणाच्या आधारे संषोधनात्मक अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले: विशय प्रवेष

1) आपत्ती व्यवस्थापन पाष्र्वभूमी (प्रस्तावना)

2) संषोधनाची उद्दीश्टे

3) संषोधनाची गृहितके

4) तथ्य संकलन

6) सहभागी निरीक्षण

7) नमुना निवड

8) संषोधन आराखडा

प्रकरण दुसरे: आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005

प्रकरण तिसरेः लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातील आपत्ती निवारण कक्ष

प्रकरण चैथे: लातूर जिल्ह्यातील आपत्ती (नैसर्गिक व मानवनिर्मित) अभ्यास

प्रकरण पाचवेः आपत्ती व्यवस्थापन प्रषिक्षण कार्यक्रम

प्रकरण सहावे: आपत्ती व्यवस्थापनासमोरील आव्हाने व उपाययोजना

निश्कर्श व शिफारसी

11) संदर्भ सूची

1ण् डाॅ. प्रीती पोहेकर - भारतातील आपत्ती व्यवस्थापन आणि प्रषासन,

साग प्रकाषन, नवी दिल्ली

2ण् डाॅ. प्रीती पोहेकर - लोकप्रषासनातील नवप्रवाह, अरूणा प्रकाषन, लातूर

3ण् डाॅ. बी.एल. फाडीया - लोकप्रषासन साहित्य भवन, प्रकाषन आग्रा

4ण् राश्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण भारत सरकार

5ण् निवृत्त कर्नल प्रमोद प्र. मराठे, प्रा. व्ही. जे. गोडबोले - आपत्ती व्यवस्थापन, डायमंड प्रकाषन, पुणे

6ण् पाटील सतीष यु. - आपत्ती व्यवस्थापन काळाची गरज, साप्ताहिक अहिल्यादेवी संदेष

7ण् जिल्हाधिकारी कार्यालय आपत्ती व्यवस्थापन विभाग माहितीपत्रक लातूर

8ण् डाॅ. ए. पी. चैधरी आणि अर्चना चैधरी - आपत्ती व्यवस्थापन, अथर्व प्रकाषन, जळगाव.

9ण् डाॅ. प्रीती पोहेकर - भारतातील आपत्ती व्यवस्थापन आणि प्रषासन, साग प्रकाषन, नवी दिल्ली

10ण् आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मराठी अनुवाद - श्री सुजित मुंढे, सोनु ग्राफिक्स, कोल्हापूर

11ण् आपतीकालीन व्यवस्थापन- लोट्स पब्लिकेषन्स प्रा. लि. व अनिरूध्द अॅकॅडमी आॅफ डिजास्टर मॅनेजमेंट, पुणे

Website Reference –

1. https://www.mha.gov.in
2. https://www.gcoedu.in
3. https://www.mca.gov.in
4. https://www.ndma.gov.in

5. https://www.unisdr.org

6. https://www.latur.gov.in

7. https://www.latur.gov.in/en/about-district/listof-collectors

8. https://www.aajtak.in

9. https://www.mahadish.in

10. https://www.researchgate

11. ICIMOD- https://lib/inimod.org

12. https://enM.wikipedia-(Nidm)

13. https://Nidm.gov.in